**RNI No. MAHBIL /2009/35530**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ९, अंक १८] गुरुवार, मे ११, २०२३/वैशाख २१, शके १९४५ [पृष्ठे २६, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक २६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**- महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | **पृष्ठे** १-२६ |

दिनांक १० मे २०२३ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**सतिश वाघोले,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक ११ मे २०२३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

२००७ चा महा. ३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,— २००७ चा महा. ३.

(१) खंड (१) मधील स्पष्टीकरणाऐवजी, पुढील स्पष्टीकरण दाखल करण्यात येईल :—

" **स्पष्टीकरण.—** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, "इमारत" या शब्दप्रयोगामध्ये, तात्पुरत्या स्वरूपात व समारंभ प्रसंगी उभारलेले तंबू, शामियाने व ताडपत्र्यांची आश्रयस्थाने यांसारख्या तात्पुरत्या संरचनांचा देखील समावेश असेल ;";

(२) खंड (४) मधील, "अग्निशमन सेवा" या मजकुराऐवजी, "अग्निशमन व आपत्कालीन सेवा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) खंड (४) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(४क) "अग्निशमन व आपत्कालीन सेवा" याचा अर्थ, जेव्हा जीवितास किंवा मालमत्तेस धोका असतो अशा, मानवनिर्मित किंवा नैसर्गिक आपत्तीच्या किंवा कोणत्याही संभाव्य घटनेच्या बाबतीत, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा नियोजन प्राधिकरणाकडून अथवा राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या अशा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडून देणे आवश्यक असलेली सेवा, असा आहे.";

(४) खंड (५) मधील, "भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता, २००५" या मजकुराऐवजी, "भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) खंड (६) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(६) "लायसनप्राप्त अभिकरण " याचा अर्थ, या अधिनियमान्वये आवश्यक असतील अशा आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना हाती घेण्याकरिता किंवा त्यांची अंमलबजावणी करण्याकरिता किंवा इतर संबंधित कामे पार पाडण्याकरिता संचालकाकडून लायसन देण्यात आलेली एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींचा संघ, असा आहे ;";

(६) खंड (८) मधील, "भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता, २००५" या मजकुराऐवजी, "भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(७) खंड (९) मधील, "नामनिर्देशित केलेला एखादा अधिकारी, असा आहे आणि यात, स्थानिक प्राधिकरणाने किंवा नियोजन प्राधिकरणाने या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ;" या मजकुराऐवजी, " किंवा स्थानिक प्राधिकरणाने किंवा नियोजन प्राधिकरणाने, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता नामनिर्देशित केलेला एखादा अधिकारी, असा आहे ;" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(८) खंड (१४) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(१४) "संबंधित नगरपालिका कायदा " याचा अर्थ,—

(क) मुंबई महानगरपालिका अधिनियम ; १८८८ चा ३.

(ख) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ; १९४९ चा ५९.

(ग) महाराष्ट्र नगपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, असा आहे ;". १९६५ चा महा. ४०.

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील,—

(क) "आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजनांशी संबंधित असलेला " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " कार्यक्षम स्थितीत ठेवील : " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांशी संबंधित असलेला आणि त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही कायदा किंवा त्याखाली तयार करण्यात आलेले नियम, विनियम किंवा उपविधी किंवा भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता यांच्या तरतुदींना बाध न आणता, अनुसूची-एक मध्ये वर्गीकृत केलेल्या कोणत्याही इमारतीचा किंवा अशा कोणत्याही इमारतीच्या भागाचा मालक, किंवा मालक सापडत नसल्यास भोगवटादार, संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा नियोजन प्राधिकरणाच्या मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याकडून आणि जेथे मुख्य अग्निशमन अधिकारी नसेल अशा क्षेत्रांमध्ये, किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा नियोजन प्राधिकरणाच्या हद्दी बाहेरील क्षेत्रांमध्ये संचालकाकडून, आवश्यक असलेली तात्पुरती आग संरक्षक मान्यता किंवा अंतिम आग संरक्षक मान्यता मिळवील, किंवा यथास्थिति, आग संरक्षक मान्यतेचे नूतनीकरण करील. भारतीय राष्ट्रीय इमारत संहितेच्या भाग-४ मध्ये किंवा त्याच्या कोणत्याही संबंधित भागांमध्ये आणि वेळोवेळी लागू असलेल्या अनुसूची-एक मध्ये विहित केलेल्या आणि अशा इमारतीसमोर विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे किमान आग संरक्षक संच मांडणीची आवश्यक मर्यादेपेक्षा कमी नसेल अशा, संबंधित आग संरक्षक मान्यतेमध्ये शिफारस केलेल्या आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांची मालक किंवा भोगवटादार तरतूद करील ; आणि या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार, आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नेहमी सुस्थितीत व कार्यक्षम स्थितीत ठेवील :";

(ख) परंतुकानंतर, **स्पष्टीकरणाऐवजी**, पुढील **स्पष्टीकरण** दाखल करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "तात्पुरती आग संरक्षक मान्यता" याचा अर्थ, इमारतीचा आराखडा मंजूर करतेवेळी व तिचे बांधकाम करण्यापूर्वी, हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम याद्वारे किंवा तद्न्वये तरतूद केल्याप्रमाणे, आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांनुसार, संचालक किंवा संबंधित स्थानिक प्राधिकरणाचा किंवा नियोजन प्राधिकरणाचा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी केलेल्या शिफारसी, असा आहे ;

(ख) "अंतिम आग संरक्षक मान्यता" याचा अर्थ, यथोचित प्राधिकरणाकडून इमारत पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी, तात्पुरत्या आग संरक्षक मान्यतेनुसार, आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना असल्याची खात्री केल्यानंतर, संचालक किंवा संबंधित स्थानिक प्राधिकरणाचा किंवा नियोजन प्राधिकरणाचा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र, असा आहे ;

(ग) "आग संरक्षक मान्यतेचे नूतनीकरण" याचा अर्थ, संचालक किंवा संबंधित स्थानिक प्राधिकरणाचा किंवा नियोजन प्राधिकरणाचा मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी दिलेले नूतनीकरण प्रमाणपत्र, असा आहे :

परंतु, उक्त प्राधिकरणाकडून संबद्ध अधिनियम, नियम, इत्यादींनुसार आवश्यक किंवा अनिवार्य असल्यास, नूतनीकरण प्रमाणपत्र देण्यात येईल.";

(२) पोट -कलम (१क) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

"(१ख) पोट-कलम (१) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) अनुसूची - एक मधील (ख) नुसार विनिर्दिष्ट केलेल्या भोगवट्यांच्या, म्हणजेच शैक्षणिक इमारतीच्या बाबतीत, जर अशी इमारत, संबंधित आग संरक्षक मान्यतेनुसार शिफारस केलेल्या आणि अनुसूची-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अग्निशमन यंत्रणा बसविण्याच्या किमान

आवश्यकतेपेक्षा कमी नसतील अशा, आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या किमान आवश्यकतांची पूर्तता करीत असतील तर, महानगरपालिका व विशेष नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रांमध्ये ३० मीटरपेक्षा अधिक उंचीच्या, परंतु ४५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या इमारतीस, परवानगी देता येईल ;

(ख) महानगरपालिका आणि विशेष नियोजन प्राधिकरण यांच्या हद्दीबाहेरील क्षेत्रांमध्ये, राज्य शासनास, बांधकाम आराखडा मंजूर करण्यासाठी अधिकार असलेल्या प्राधिकरणाला त्यांच्या विनंतीवरून असे प्रमाणपत्र देण्यासाठी, ३० मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतींच्या संबंधात अनुसूची-एक मधील (ख) नुसार विनिर्दिष्ट केलेल्या भोगवट्यांच्या बाबतीत, म्हणजेच शैक्षणिक इमारतींच्या बाबतीत, जर अशा इमारती, संबंधित आग संरक्षक मान्यतेनुसार शिफारस केलेल्या आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या किमान आवश्यकतांची, पूर्तता करीत असतील तर, आणि अनुसूची-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अग्निशमन यंत्रणा बसविण्याच्या किमान आवश्यकतेपेक्षा कमी नसतील तर, परवानगी देता येईल.

(१ग) पोट-कलम (१) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये अथवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १५ मीटरपेक्षा उंच परंतु २४ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या इमारतीमध्ये, ४५ मीटरपर्यंत बहुस्तरीय मोटार वाहनतळास (एमएलसीपी), इमारतीच्या किमान एका बाजुला संलग्न असलेल्या किंवा स्वतंत्र अशा कोणत्याही संरचनेस यांत्रिक स्वयंचलित मोटार वाहनतळास १०० मीटर पर्यंतच्या किंवा डिझेल जनरेटर संच ठेवणे यांसारख्या उपयोगिता प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या अशा इतर कोणत्याही संरचनेस (इमारतीस), अनुसूची-एक मध्ये (ज) नुसार विनिर्दिष्ट केलेल्या भोगवट्याच्या बाबतीत म्हणजेच साठवण इमारतींच्या बाबतीत, जर अशा इमारती संबंधित आग संरक्षक मान्यतेनुसार शिफारस केलेल्या आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या किमान आवश्यकतांची पूर्तता करीत असतील तर आणि अनुसूची-एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अग्निशमन यंत्रणा बसविण्याच्या किमान आवश्यकतांपेक्षा कमी नसतील तर, परवानगी देता येईल.";

(३) पोट -कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३क) कलम ४५ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या इमारतीसाठी, मालक, किंवा मालक सापडत नसल्यास, इमारतीचा भोगवटादार, संबंधित आग संरक्षक मान्यतेमध्ये शिफारस केल्याप्रमाणे, अग्निशमन यंत्रणा ही, सुस्थितीत आहे व कार्यक्षमपणे काम करण्याच्या स्थितीत आहे याची खात्री करण्यासाठी, विहित करण्यात येईल अशा स्वयंचलित निरंतर सनियंत्रण प्रणालीची तरतूद केली आहे याची खात्री करील आणि ती, लायसनप्राप्त अभिकरणाकडून विहित नमुन्यामध्ये व विहित रीतीने प्रमाणित करण्यात येईल आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने संबंधित प्राधिकरणास सादर करण्यात येईल.".

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,—

(१) "मुख्य अग्निशमन अधिकारी" हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह आला आहे त्या त्या ठिकाणी त्याऐवजी "संचालक" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मधील, "पाच रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक" या मजकुराऐवजी, "विहित करण्यात येईल असा न्यायालय फी मुद्रांक" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मधील, "एका वर्षाच्या" या मजकुराऐवजी, "दोन वर्षांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) पोट-कलम (५) वगळण्यात येईल.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १० मध्ये, पोट-कलम (१) च्या परंतुकामधील, "मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याची" या मजकुराऐवजी, "संचालकाची" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १० ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ११ मध्ये,— सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ११ ची सुधारणा.

(१) पोट-कलमे (१) व (२) यांऐवजी, पुढील पोट-कलमे दाखल करण्यात येतील :—

२०२३ चा महा. २४. "(१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०२३ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, आणि या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, हा अधिनियम ज्यांना लागू आहे अशा स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा नियोजन प्राधिकरणाच्या (यात यापुढे, अन्यथा उल्लेख केला असेल त्याव्यतिरिक्त, या संपूर्ण अधिनियमात ज्याचा निर्देश एकत्रितरीत्या, "प्राधिकरण" असा केला आहे) क्षेत्रांमधील किंवा अन्य क्षेत्रांमधील, अनुसूची-दोन मध्ये (यात यापुढे, या प्रकरणामध्ये जिचा निर्देश "उक्त अनुसूची" असा केला आहे) वर्गीकृत केल्याप्रमाणे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, इमारतींच्या सर्व मालकांवर, किंवा, यथास्थिति, भोगवटादारांवर, अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी आकारण्यात येईल.

(२) अशा फीचा दर, कोणत्याही प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये किंवा हा अधिनियम ज्यांना लागू आहे अशा क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या इमारतींच्या प्रत्येक प्रकाराच्या बाबतीत, अनुसूची-दोन मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल.";

(२) पोट-कलम (३) मधील,—

(क) " प्राधिकरणास," या मजकुराऐवजी, "प्राधिकरणास आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू होतो त्या क्षेत्रांमध्ये, संचालकास," हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) परंतुकामधील,—

(एक) "प्राधिकरणास," या मजकुराऐवजी, "प्राधिकरणास आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकास," हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) "उक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान दरापेक्षा" या मजकुराऐवजी, "उक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरापेक्षा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (४) मधील,—–

(क) "प्राधिकरण" या मजकुरानंतर, "किंवा संचालक " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(ख) "अग्निशमन सेवेचे" या मजकुराऐवजी, "अग्निशमन व आपत्कालीन सेवेचे " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये,— सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १२ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(१क) संचालक, अर्ज प्राप्त झाल्यावर किंवा स्वाधिकारे, दर वाढवण्यापूर्वी किंवा वाढीव दर कमी करण्यापूर्वी आणि अशा दराने फी आकारण्यापूर्वी, प्रस्तावास, राज्य शासनाची पूर्व मंजुरी घेईल.";

(२) पोट-कलम (२) मधील, "प्राधिकरणाच्या" या मजकुरानंतर, "किंवा संचालकाच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मधील, खंड (क) मध्ये, "प्राधिकरण" या मजकुरानंतर, "किंवा संचालक" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(४) समासटीपेतील, "प्राधिकरणाने" या मजकुरानंतर, "किंवा संचालकाने" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, " अनुसूची—दोनच्या " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "विनिर्दिष्ट केलेल्या किमान फीच्या" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, " उक्त अनुसूचीमधील प्रत्येक प्रकारच्या इमारतीच्या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मधील, "प्राधिकरणास," या मजकुराऐवजी, "प्राधिकरणास आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकास," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, "प्राधिकरणाच्या" या मजकुराऐवजी, " प्राधिकरणाच्या आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकाच्या," आणि "प्राधिकरणाकडे" या मजकुराऐवजी, "प्राधिकरणाकडे आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकाकडे," हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मधील, "प्राधिकरण " या मजकुराऐवजी, " प्राधिकरण आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालक " आणि " प्राधिकरणाच्या" या मजकुरानंतर, "प्राधिकरणाच्या आणि प्राधिकरणांच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल; आणि परंतुकामधील, "प्राधिकरणास" या मजकुराऐवजी, "प्राधिकरणास आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकास" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि "प्राधिकरण" या मजकुराऐवजी, " प्राधिकरण आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालक" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि "प्राधिकरणाची " या मजकुराऐवजी, " प्राधिकरणाची आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकाची " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (४) मधील, "प्राधिकरणाने" या मजकुराऐवजी " प्राधिकरणाने आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकाने" आणि "प्राधिकरणाच्या" या मजकुराऐवजी, " प्राधिकरणाच्या आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकाच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि **स्पष्टीकरणामधील**, " प्राधिकरणाकडे" या मजकुराऐवजी, " प्राधिकरणाकडे आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकाकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(४) पोट-कलम (६) मधील, " प्राधिकरण " या मजकुराऐवजी, " प्राधिकरण आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालक" आणि **स्पष्टीकरणामधील,** "प्राधिकरणास" या मजकुराऐवजी, "प्राधिकरणास आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकास," हा मजकूर दाखल करण्यात येईल ; आणि " प्राधिकरण" हा मजकूर ज्या दोन ठिकाणी आला आहे तेथे त्या मजकुराऐवजी, "प्राधिकरण आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालक " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) पोट-कलम (७) च्या खंड (ख) मधील, "प्राधिकरणाच्या" या मजकुराऐवजी, " प्राधिकरणाच्या आणि प्राधिकरणाच्या हद्दीबाहेरील ज्या क्षेत्रांस हा अधिनियम लागू आहे त्या क्षेत्रांमध्ये, संचालकाच्या," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६ मधील,–

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :–

"(१) अग्निशमन साधनसामग्री व साहित्य खरेदी करण्यासाठी आणि ते बाळगण्यासाठी आणि त्याचे परिरक्षण करण्यासाठी जो खर्च करणे आवश्यक असेल असा, कोणताही खर्च भागविण्यासाठी, किंवा अग्निशमन व आपत्कालीन सेवा पुरविण्याच्या किंवा सर्वसाधारणपणे अग्निशमन कामे पार पाडण्याच्या संबंधातील गरजा भागविण्याकरिता अधिकारी, कर्मचारीवर्ग आणि सेवकवर्ग यांच्या पदांची निर्मिती करण्यासाठी, कोणत्याही प्राधिकरणाच्या किंवा संचालकाच्या आग सुरक्षा निधीमधील शिल्लक रक्कम अपुरी आहे किंवा अशी शिल्लक रक्कम ही, उपरोक्त प्रयोजनांसाठी असलेल्या गरजेपेक्षा अधिक आहे, असे राज्य शासनास दिसून आले तर, राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उक्त अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने फीचा दर वाढविण्यास किंवा कमी करण्यास, प्राधिकरणास किंवा संचालकास फर्मावता येईल.";

(२) समासटीपेतील, "प्राधिकरणास" या मजकुरानंतर, "किंवा संचालकास" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**११.** प्रकरण पाच मधील, **"अग्निशमन सेवा संचालक"** या शीर्षाऐवजी, **" संचालक, अग्निशमन व आपत्कालीन सेवा"** हे शीर्ष दाखल करण्यात येईल.

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या प्रकरण पाच ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मधील,—

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १८ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मधील, "अग्निशमन सेवा संचालक " या मजकुराऐवजी, "संचालक, अग्निशमन व आपत्कालीन सेवा" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मधील, "अग्निशमन सेवांच्या" या मजकुराऐवजी, "अग्निशमन व आपत्कालीन सेवांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ मध्ये,—

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १९ ची सुधारणा.

(१) " च्या पोट-कलम (३)" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) "अग्निशमन सेवा" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह ज्या ज्या ठिकाणी आला आहे त्या त्या ठिकाणी त्याऐवजी, "अग्निशमन व आपत्कालीन सेवा" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल.

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ मध्ये,—

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २१ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मधील, "अग्निशमन सेवांच्या" या मजकुराऐवजी, "अग्निशमन व आपत्कालीन सेवांच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) समासटीपेतील, "अग्निशमन सेवांमध्ये" या मजकुराऐवजी, "अग्निशमन व आपत्कालीन सेवांमध्ये" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मध्ये,—

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २२ ची सुधारणा.

(१) "अग्निशमन सेवा" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह ज्या ज्या ठिकाणी आला आहे त्या त्या ठिकाणी त्या ऐवजी, "अग्निशमन व आपत्कालीन सेवा"हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात येईल ;

(२) समासटीपेतील, "महाराष्ट्र अग्निशमन सेवा" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २४ ची सुधारणा.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ मध्ये, "अग्निशमन सेवेवर" या मजकुराऐवजी, "अग्निशमन व आपत्कालीन सेवेवर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २७ ची सुधारणा.

**१७.** मुख्य अधिनियमाच्या कलम २७ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील,—

(क) "आग लागली असेल त्या प्रसंगी" या मजकुराऐवजी, "आग लागली असेल त्या प्रसंगी किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (क) मधील, "आग विझविण्याच्या किंवा जीव किंवा मालमत्ता वाचवण्याच्या कामामध्ये" या मजकुराऐवजी, "जीव किंवा मालमत्ता वाचविण्यासाठी आग विझविण्याच्या किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला प्रतिसाद देण्याच्या कामामध्ये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) खंड (ख) मधील, "जिथे आगीने पेट घेतला आहे" या मजकुरानंतर, "किंवा कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवली आहे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(घ) खंड (ग) मधील, "आग विझविण्याच्या" या मजकुरानंतर, "किंवा कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याच्या" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ङ) खंड (ङ) मधील, "अग्निशमन कार्यास" या मजकुरानंतर, "किंवा कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(च) खंड (च) मधील, "आग विझविण्याकरिता किंवा जीव वा मालमत्ता यांच्या सुरक्षेकरिता" या मजकुराऐवजी, "जीव किंवा मालमत्ता यांच्या सुरक्षेकरिता, आग विझविण्याकरिता किंवा कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याकरिता" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल,—

"(२) आग लागल्याच्या प्रसंगी किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत, आपली कर्तव्ये यथोचितपणे पार पाडताना, अग्निशमन व आपत्कालीन सेवेच्या कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही जागांचे किंवा मालमत्तेचे झालेले कोणतेही नुकसान हे, आगीच्या विम्याच्या किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीच्या विम्याच्या कोणत्याही विमापत्राच्या अर्थांतर्गत आगीमुळे किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीमुळे झालेले नुकसान असल्याचे मानण्यात येईल.";

(३) पोट-कलम (२) नंतर, पुढील **स्पष्टीकरण** जादा दाखल करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनार्थ, "आपत्कालीन परिस्थिती" याचा अर्थ, मानवी किंवा नैसर्गिक आपत्ती किंवा जेथे जीव किंवा मालमत्ता धोक्यात आहे अशी कोणतीही संभाव्य घटना, असा आहे.";

(४) समासटीपेमध्ये, "आग लागली असेल अशा प्रसंगी" या मजकुरानंतर, " किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीमध्ये" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

**१८.** मुख्य अधिनियमाच्या कलम २९ मध्ये,— सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम २९ ची सुधारणा.

(१) "अग्निशमनाच्या प्रयोजनासाठी" या मजकुरानंतर, "किंवा कोणतीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(२) "आगीचा" या मजकुराऐवजी, "आगीचा किंवा कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये, पोट-कलम (१) मधील,— सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३२ ची सुधारणा.

(१) खंड (क) पूर्वी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(१-क) कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये दिलेली आग संरक्षक मान्यता, किंवा";

(२) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(खख) कलम ९ च्या पोट-कलम (३) किंवा (४) अन्वये दिलेला आदेश, किंवा";

(३) खंड (ग) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(घ) कलम ४५क च्या पोट-कलम (५) किंवा (६) खालील आदेश,".

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३३ मध्ये, खंड (क) मधील,— सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३३ ची सुधारणा.

(१) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

"(एक) कलम ३२ च्या पोट-कलम (१) चे खंड (१-क), (क), (ख), (खख) किंवा (घ) खालील अपील, आग संरक्षक मान्यता दिलेल्या दिनांकापासून किंवा नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून किंवा अर्जदारास नकार कळविल्याच्या दिनांकापासून किंवा आदेश काढल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत दाखल केले नसेल तर:";

(२) परंतुकामध्ये, "पंधरा दिवसांचा" या मजकुराऐवजी, "तीस दिवसांचा" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "३० मीटरहून अधिक उंच असलेल्या आणि पुढील प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारती,–" या शीर्षाला खंड (क) हा क्रमांक देण्यात येईल आणि असा क्रमांक देण्यात आलेल्या खंड (क) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :— सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४५ ची सुधारणा.

"(ख) पुढील प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारती,—

(१) ७० मीटरहून अधिक उंची असलेली निवासी इमारत,

(२) रिफायनरीज, एलपीजी गॅस कुपीभरण संयंत्र (LPG bottling plant) व तत्सम अन्य सुविधा यांसारखी मोठी तेल व नैसर्गिक वायू संच मांडणी,

(३) ३०,००० चौरस मीटर किंवा त्यापेक्षा अधिक बांधकाम क्षेत्र असणारी मध्यम धोकादायक स्वरूपाची आणि १०,००० चौरस मीटर किंवा त्यापेक्षा अधिक बांधकाम क्षेत्र असणारी अति धोकादायक स्वरूपाची असणारी औद्योगिक इमारत.".

सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ मध्ये नवीन कलम ४५क समाविष्ट करणे.

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवक्षित इमारतींचे अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षण.

“**४५क.** (१) (क) कलम ४५ च्या पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या सर्व भोगवट्यांचे, लायसनधारक अग्निशमन व जीवसंरक्षक परीनिरीक्षकाद्वारे, मालकाकडून किंवा जेव्हा मालक सापडत नसल्यास, इमारतीच्या भोगवटादाराकडून, अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षण करण्यात येईल आणि असे अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षण, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम, २०२३ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत आणि त्यानंतर, प्रत्येक दोन वर्षातून एकदा करण्यात येईल. २०२३ चा महा. २४.

(ख) मालक किंवा, यथास्थिति, भोगवटादार, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींद्वारे किंवा तरतुदींअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, त्याच्या अशा इमारतीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांच्या मूल्यमापनासंबंधात लायसनधारक अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षकाने दिलेल्या विहित नमुन्यामधील प्रमाणपत्र, संचालकाला किंवा मुख्य अग्निशमन अधिकाऱ्याला किंवा नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याला सादर करील.

**स्पष्टीकरण.—**या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, “अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षण” याचा अर्थ, प्रचलित अधिनियम किंवा नियम किंवा भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता यानुसार आवश्यक असलेल्या आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना यांचे मूल्यमापन, असा आहे.

(२) संचालकास, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, विहित केलेली अशी अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या, त्याला योग्य वाटेल अशा, कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या संघास अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षक म्हणून काम करण्यासाठी, लायसन देता येईल.

(३) अशा परिनिरीक्षकाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्याप्रमाणे असतील.

(४) असे लायसन मिळविण्याचा किंवा त्याचे नूतनीकरण करण्याचा उद्देश असणारी कोणतीही व्यक्ती, विहित केलेल्या नमुन्यात व विहित केलेल्या रीतीने संचालकाकडे अर्ज करील. अशा अर्जावर, विहित करण्यात येईल असा न्यायालय फी मुद्रांक लावील आणि त्यासोबत विहित फीची पूर्तता करील.

(५) असा अर्ज प्राप्त झाल्यावर, संचालक, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, एकतर, दोन वर्षांच्या कालावधीसाठी विहित नमुन्यात लायसन देऊ शकेल किंवा तत्सम कालावधीसाठी त्याचे नूतनीकरण करू शकेल अथवा कारणे लेखी नमूद करून असे लायसन देण्यास किंवा त्याचे नूतनीकरण करण्यास, आदेशाद्वारे, नकार देऊ शकेल.

(६) जेव्हा संचालकास, ज्या व्यक्तीस लायसन देण्यात आले आहे अशा कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे अथवा लायसनच्या शर्तींचे पालन करण्यात तिने कसूर केली आहे अथवा अक्षमतेच्या, गैरवर्तणुकीच्या कारणांसाठी किंवा अन्य कोणत्याही गंभीर कारणांसाठी ती अपात्र आहे असा विश्वास ठेवण्यास कारण असेल त्याबाबतीत, संचालक, कारणे दाखवण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आदेशाद्वारे, कारणे लेखी नमूद करून लायसन निलंबित करू शकेल किंवा रद्द करू शकेल.

(७) लायसन देण्यात आलेल्या अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षकाव्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती, कोणत्याही ठिकाणी किंवा इमारतीमध्ये किंवा तिच्या भागामध्ये अग्निशमन परिनिरीक्षणाचे काम करणार नाही किंवा त्यासंबंधात आवश्यक अशी इतर कामे करणार नाही.

(८) अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षक किंवा असा अग्निशमन व जीवसंरक्षक परिनिरीक्षक असल्याचा दावा करणारी कोणताही व्यक्ती, अशा आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना तेथे प्रत्यक्ष असल्याशिवाय, आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना चांगल्या व कार्यक्षम स्थितीत आहेत याच्या मूल्यमापनासंबंधात पोट-कलम (१) अन्वये प्रमाणपत्र देणार नाही.".

**२३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ मध्ये कलम ४८क समाविष्ट करणे.

"**४८क.** (१) जीव व मालमत्ता सुरक्षेशी संबंधित भारतीय राष्ट्रीय इमारत संहितेच्या कोणत्याही भागाच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनांकरिता अनुसूची—एक ची सुधारणा करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटली तर, ते **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे सुधारणा करील आणि त्यानंतर उक्त अनुसूचीची त्यानुसार सुधारणा केली असल्याचे मानण्यात येईल. अनुसूची-एक मध्ये सुधारणा करण्याचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.".

**२४.** मुख्य अधिनियमाच्या अनुसूची-एक व अनुसूची-दोन यांऐवजी, पुढील अनुसूच्या दाखल करण्यात येतील :— सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ याच्या अनुसूची-एक व अनुसूची-दोन ऐवजी नवीन अनुसूची-एक व अनुसूची-दोन दाखल करणे.

## अनुसूची —एक

(कलम ३ (१) पहा)

### अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | अग्निशमन यंत्रणेचे प्रकार | | | | | | | | पाणीपुरवठा (लिटरमध्ये) | | पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | **निवासी इमारती (क)** | | | | | | | | | | | | |
| **(क)** | **लॉजिंग किंवा भाड्याने देता येतील अशी घरे (क-१) आणि एक किंवा दोन कुटुंबांचे खाजगी राहते घर (क-२) [टीप ३(घ) पहा]** | | | | | | | | | | | | |
| (१) | १५ मीटर पेक्षा कमी उंच असलेले | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | ५,००० (टीप ५ पहा) | आवश्यक नाही | आवश्यक नाही |
| (२) | १५ मीटर व त्यापेक्षा अधिक परंतु ३५ मीटर पेक्षा अधिक उंच नसलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | २५,००० | आवश्यक नाही | ९०० |
| (३) | ३५ मीटर व त्यापेक्षा अधिक परंतु ४५ मीटर पेक्षा अधिक उंच नसलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक [टीप ४, टीप १५ (क)] | आवश्यक | आवश्यक | ७५,००० | ५,००० | (टीप १०) | आवश्यक नाही |
| **(ख)** | **शयनगृहे (क-३) सदनिकागृहे (क-४)** (टीप ८ व २२ पहा) | | | | | | | | | | | | |
| (१) | १५ मीटर पेक्षा कमी उंची असलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | ५,००० (५,०००) (टीप ६ पहा) | आवश्यक नाही | ४५० (४५०) (टीप ६ पहा) |
| (२) | १५ मीटर व त्यापेक्षा अधिक परंतु ३५ मीटर पेक्षा अधिक उंच नसलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | २५,००० | आवश्यक नाही | ९०० |
| (३) | ३५ मीटर पेक्षा अधिक परंतु ४५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक [टीप ४, टीप १५ (क)] | आवश्यक | आवश्यक नाही | ७५,००० | ५,००० | (टीप १०) | आवश्यक नाही |

## अनुसूची —एक

(कलम ३ (१) पहा)

### अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | अग्निशमन यंत्रणेचे प्रकार | | | | | | | | पाणीपुरवठा (लिटरमध्ये) | | पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| (४) | ४५ मीटर पेक्षा अधिक उंच परंतु ६० मीटर पेक्षा अधिक उंच नसलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक [टीप १५ (क) , व टीप १५ (ख)] | आवश्यक | आवश्यक नाही | १,५०,००० | १०,००० | (टीप ११) | आवश्यक नाही |
| (५) | ६० मीटरपेक्षा अधिक उंच असलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक [टीप १५ (ख)] | आवश्यक | आवश्यक | २,००,००० | १०,००० | (१२ व १३) | आवश्यक नाही |
| **(ग)** | **हॉटेल क-५** (टिपा ८ आणि २२) | | | | | | | | | | | | |
| (१) | १५ मीटर पेक्षा कमी उंच असलेली | | | | | | | | | | | | |
| | (एक) कोणत्याही मजल्यावर ५०० चौ. मीटरपेक्षा अधिक नाही इतके व्यापलेले क्षेत्र. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | ५,००० (५,०००) (टीप ६ पहा) | आवश्यक नाही | ४५० (४५०) (टीप ६ पहा) |
| | (दोन) कोणत्याही मजल्यावर ५०० चौ. मीटर पेक्षा अधिक परंतु १००० चौ. मीटर पेक्षा अधिक न व्यापलेले क्षेत्र. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | २०,००० (५,०००) (टीप ६ व ७) | आवश्यक नाही | ४५० (४५०) (टीप ६ ) |
| | (तीन) कोणत्याही मजल्यावर १००० चौ. मीटरपेक्षा अधिक व्यापलेले क्षेत्र. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक [टीप १५ (क) आणि १५ (ख)] | आवश्यक | आवश्यक | १,००,००० | १०,००० (टीप ४) | टीप १० | आवश्यक नाही |
| (२) | १५ मीटर व त्यापेक्षा अधिक परंतु ३० मीटरपेक्षा अधिक उंच नसलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक [टीप १५ (क) आणि १५ (ख)] | आवश्यक | आवश्यक | १,५०,००० | २०,००० | टीप १० | आवश्यक नाही |
| (३) | ३० मीटरपेक्षा अधिक उंच असलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक [टीप १५ (क) आणि १५ (ख)] | आवश्यक | आवश्यक | २,००,००० | २०,००० | टीप ११ व १३ | आवश्यक नाही |

## अनुसूची —एक
(कलम ३ (१) पहा)
### अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | अग्निशमन यंत्रणेचे प्रकार | | | | | | | | पाणीपुरवठा (लिटरमध्ये) | | पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| **(घ)** | **हॉटेल (क-६)** | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) आणि १५ (ख)) | आवश्यक | आवश्यक | २,५०,००० | २०,००० | टीप १२ व १३ | आवश्यक नाही |
| | **शैक्षणिक इमारती (ख)** (टीप ३घ आणि ३ च पहा) | | | | | | | | | | | | |
| (१) | १५ मीटरपेक्षा कमी उंच असलेली | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | १०,००० (५,०००) (टीप ६ आणि ७) | आवश्यक नाही | ४५० (४५०) (टीप ६) |
| (२) | १५ मीटर व त्यापेक्षा अधिक परंतु २४ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | २५,००० | आवश्यक नाही | ९०० |
| (३) | २४ मीटर पेक्षा अधिक परंतु ३० मीटरपेक्षा अधिक उंच नसलेली. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | ५०,००० | ५,००० (टीप ६) | (टीप १४) | आवश्यक नाही |
| (४) | ३० मीटर व त्यापेक्षा अधिक परंतु ४५ मीटरपर्यंत उंच असलेली. [टीप ३(च) पहा] | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | ७५,००० | १०,००० (टीप ६) | (टीप ११) | ४५० |
| | **संस्थेच्या इमारती (ग)** (टीप ८ आणि २२ पहा) | | | | | | | | | | | | |
| **(क)** | **रुग्णालये, आरोग्यधाम व शुश्रुषालये (ग-१) [टीप ३ (ङ) पहा]** | | | | | | | | | | | | |
| (१) | १५ मीटरपेक्षा कमी उंच असलेले त्यासोबत १००० चौ क्षेत्र असलेले | | | | | | | | | | | | |
| | (एक) खाटा नसलेल्या तळमजला अधिक एक मजल्यापर्यंत | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | २५०० (२५००) (टीप ६ पहा) | आवश्यक नाही | (४५०) (टीप ६) |

## अनुसूची —एक

(कलम ३ (१) पहा)

### अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | अग्निशमन यंत्रणेचे प्रकार | | | | | | | | पाणीपुरवठा (लिटरमध्ये) | | पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | (दोन) खाटा असलेल्या तळमजला अधिक एक मजल्यापर्यंत | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | ५,००० (५,०००) (टीप ६ पहा) | आवश्यक नाही | ४५० (४५०) (टीप ६ पहा) |
| | (तीन) तळमजला व खाटा नसलेल्या व दोन मजल्यांपेक्षा अधिक मजले असलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | १०,००० (५,०००) (टीप ६ पहा) | आवश्यक नाही | ९०० (४५०) (टीप ६ पहा) |
| | (चार) तळमजला व खाटा असलेल्या व दोन मजल्यांपेक्षा अधिक मजले असलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टिपा १५ (क) आणि १५ (ख)) | आवश्यक | आवश्यक | ५०,००० | १०,००० | (टीप १०) | आवश्यक नाही |
| (२) | १००० चौ मीटरपेक्षा अधिक भुखंड त्यासोबत १५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) आणि १५ (ख)) | आवश्यक | आवश्यक | १,००,००० | १०,००० | (टीप १०) | आवश्यक नाही |
| (३) | १५ मीटरपेक्षा जास्त आणि ३० मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) आणि १५ (ख)) | आवश्यक | आवश्यक | १,५०,००० | २०,००० | (टीप १०) | आवश्यक नाही |
| (४) | ३० मीटरपेक्षा अधिक परंतु ४५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) आणि १५ (ख)) | आवश्यक | आवश्यक | २,००,००० | २०,००० | (टीप ११) | आवश्यक नाही |
| (५). | ४५ मीटरपेक्षा अधिक उंच असलेल्या (पहा टीप ३(ङ)) | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख)) | आवश्यक | आवश्यक | २,००,००० + ५,००० ४५ मीटरपेक्षा अधिक असलेल्या प्रति पाच मीटरकरिता | २०,००० + ५,००० ४५ मीटरपेक्षा अधिक असलेल्या प्रति पाच मीटरकरिता | (टीप १२ व १३) | आवश्यक नाही |

## अनुसूची —एक

(कलम ३ (१) पहा)

### अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | अग्निशमन यंत्रणेचे प्रकार | | | | | | | | पाणीपुरवठा (लिटरमध्ये) | | पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| **(ख)** | **अभिरक्षार्थ (Custodial) ग-२), आणि शिक्षार्थ (Penal) व मानसोपचार (Mental) (ग-३) (टीप ३ ख पहा)** | | | | | | | | | | | | |
| (१) | १० मीटरपेक्षा कमी उंच असलेल्या. | | | | | | | | | | | | |
| | (एक) ३०० व्यक्तींपर्यंत. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | १०,००० (५,०००) (टीप ६) | आवश्यक नाही | ४५० (४५०) (टीप ६) |
| | (दोन) ३०० व्यक्तींहून अधिक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | १५,००० (५,०००) (टीप ६) | आवश्यक नाही | ९०० (४५०) (टीप ६) |
| (२) | १० मीटर व त्यापेक्षा जास्त परंतु १५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक | १,००,००० | ५,००० (५,०००) (टीप ६) | (टीप १०) | आवश्यक नाही |
| (३) | १५ मीटर व त्यापेक्षा जास्त परंतु २४ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | १,५०,००० | १०,००० | (टीप १०) | आवश्यक नाही |
| (४) | २४ मीटर व त्यापेक्षा जास्त परंतु ३० मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | २,००,००० | २०,००० | (टीप ११) | आवश्यक नाही |
| | **समाजमंदिर (घ) (टीप ३ ख, ८ व, २२)** | | | | | | | | | | | | |
| **(क)** | **इमारती (घ-१ ते घ-५)** | | | | | | | | | | | | |
| (१) | १० मीटरपेक्षा कमी उंच असलेल्या | | | | | | | | | | | | |
| | (एक) ३०० व्यक्तींपर्यंत | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | २०,००० (५,०००) (टीप ६) | आवश्यक नाही | ४५० (४५०) (टीप ६) |

# अनुसूची —एक

(कलम ३ (१) पहा)

## अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | अग्निशमन यंत्रणेचे प्रकार | | | | | | | | पाणीपुरवठा (लिटरमध्ये) | | पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | (दोन) ३०० व्यक्तींहून अधिक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | २५,००० (५,०००) (टीप ६) | आवश्यक नाही | ९०० |
| (२) | १० मीटरपेक्षा उंच परंतु १५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख)) | आवश्यक | आवश्यक | १,००,००० | ५,००० (५,०००) (टीप ६) | (टीप १०) | आवश्यक नाही |
| (३) | १५ मीटरपेक्षा उंच परंतु २४ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा)) | आवश्यक | आवश्यक | १,५०,००० | १०,००० | (टीप १० पहा) | आवश्यक नाही |
| (४) | २४ मीटरपेक्षा उंच परंतु ३० मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | २,००,००० | २०,००० | (टीप ११) | आवश्यक नाही |
| **(ख)** | **इमारती घ-६** | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | २,००,००० | २०,००० | (टीप १२) | आवश्यक नाही |
| **(ग)** | **इमारती घ-७** | संदर्भ : भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता - चा भाग ४ चा तक्ता ७ चा डी-७ | | | | | | | | | | | |
| | **व्यावसायिक इमारती (ङ) (टीप ८ व २२)** | | | | | | | | | | | | |
| १ | १० मीटरपेक्षा कमी उंच असलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | १०,००० (५,०००) (टीप ६) | आवश्यक नाही | ४५० (४५०) (टीप ६) |
| २ | १० मीटरपेक्षा उंच परंतु १५ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४) | आवश्यक | आवश्यक | ५०,००० | ५,००० (५,०००) (टीप ६) | (टीप १४ पहा) | आवश्यक नाही |

## अनुसूची —एक

(कलम ३ (१) पहा)

### अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | अग्निशमन यंत्रणेचे प्रकार | | | | | | | | पाणीपुरवठा (लिटरमध्ये) | | पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| ३ | १५ मीटरपेक्षा उंच आणि २४ मीटरपर्यंत उंच असलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | १,००,००० | १०,००० | (टीप १०) | आवश्यक नाही |
| ४ | २४ मीटरपेक्षा जास्त आणि ३० मीटरपर्यंत उंच असलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | १,५०,००० | २०,००० | (टीप ११) | आवश्यक नाही |
| ५ | ३० मीटरपेक्षा जास्त उंच असलेल्या | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | २,००,००० | २०,००० | (टीप १२ व १३) | आवश्यक नाही |
| | **(वाणिज्यिक इमारती (च) टीप ३ ख, ८ व २२ पहा)** | | | | | | | | | | | | |
| **(क)** | **च-१ आणि च-२** | | | | | | | | | | | | |
| (१) | १५ मीटरपेक्षा कमी उंच असलेल्या. | | | | | | | | | | | | |
| | (एक) ५०० चौ. मीटरपेक्षा अधिक नाही एवढ्या एकूण व्यापलेल्या क्षेत्रासह तळ मजला अधिक एक मजला. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४ पहा) | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | ५,००० ५,००० (टीप ६ पहा) | आवश्यक नाही | ४५० |
| | (दोन) तळ मजला अधिक एक मजला आणि ५०० चौ. मीटरपेक्षा अधिक इतके व्यापलेले क्षेत्र. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४ पहा) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | २०,००० (५,०००) (टीप ६) | आवश्यक नाही | ९०० |
| | (तीन) तळ मजला अधिक एकापेक्षा अधिक मजले. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक (टीप ४ पहा) | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | २५,००० (५,०००) (टीप ६ पहा) | आवश्यक नाही | ९०० |
| (२) | १५ मीटरपेक्षा उंच परंतु २४ मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | १,००,००० | १०,००० | (टीप १०) | आवश्यक नाही |

## अनुसूची —एक
(कलम ३ (१) पहा)

### अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | अग्निशमन यंत्रणेचे प्रकार | | | | | | | | पाणीपुरवठा (लिटरमध्ये) | | पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| (३) | २४ मीटरपेक्षा उंच परंतु ३० मीटरपेक्षा अधिक उंच नसलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | २,००,००० | २०,००० | (टीप ११) | आवश्यक नाही |
| ख | भुयारी व्यापारी संकुल (च-३) | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५ (क) व १५ (ख) पहा) | आवश्यक | आवश्यक | १,५०,००० | १०,००० | (टीप ११) | आवश्यक नाही |
| | **औद्योगिक इमारती (छ)** (टीप ८ व २२ पहा) | | | | | | | | | | | | |
| **(क)** | **कमी धोका (छ -१)** (टीप ३ (ग), १६ (क) व १६ (ख) पहा) | | | | | | | | | | | | |
| | (एक) ५०० चौरस मीटरपर्यंत भूखंडाअंतर्गत मोठ्या इमारतीचे एकूण तलक्षेत्र. | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | | १०,००० | आवश्यक नाही | आवश्यक नाही |
| | (दोन) ५०० चौरस मीटरपेक्षा अधिक परंतु २००० चौरस मीटरपर्यंत भूखंडाअंतर्गत मोठ्या इमारतीचे एकूण तलक्षेत्र. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | | २५,००० | (टीप १७) | आवश्यक नाही |
| | (तीन) २००० चौरस मीटरपेक्षा अधिक परंतु ५००० चौरस मीटरपर्यंत भूखंडाअंतर्गत मोठ्या इमारतीचे एकूण तलक्षेत्र | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | | ५०,००० | (टीप १७) | आवश्यक नाही |
| | (चार) ५००० चौरस मीटरपेक्षा अधिक भूखंडाकरिता मोठ्या इमारतीचे एकूण तलक्षेत्र | आवश्यक | आवश्यक | **(टीप १८, १९, २१ (क) व २१ (ख))** | | | | | | | | | |
| ख | **मध्यम धोका (छ-२)** (टीप ३ (ग), १६ (क) व १६ (ख)) | | | | | | | | | | | | |
| | (एक) १००० चौरस मीटरपर्यंत भूखंडाअंतर्गत मोठ्या इमारतीचे एकूण तलपृष्ठ क्षेत्र. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक नाही | | ५०,००० | (टीप १४) | आवश्यक नाही |

**अनुसूची —एक**

(कलम ३ (१) पहा)

**अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठीच्या किमान आवश्यकता**

| अनुक्रमांक | इमारतीच्या भोगवट्याचे प्रकार | **अग्निशमन यंत्रणेचे प्रकार** | | | | | | | | **पाणीपुरवठा (लिटरमध्ये)** | | **पंपाची क्षमता (लिटर/प्रति मिनिट)** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अग्निशामक | प्रथमोपचार होजपाईपची गुंडाळी | आर्द्र उन्मार्ग | खाली येणारा | यार्ड नळखांब | स्वयंचलीत तुषार यंत्रणा | हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आगसूचक यंत्रणा (टीप १) | स्वयंचलित तपास व आगसूचक यंत्रणा (टीप २) | पंपाच्या एका संचासाठी पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीची क्षमता | गच्चीवरील पाण्याची टाकी (टीप ९) | पाणी साठविण्याच्या भूमिगत टाकीजवळ बसविलेला अग्निशमन पंप | गच्चीवरील टाकीच्या पातळीवरील पंप |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| | (दोन) १००० चौरस मीटरपेक्षा अधिक परंतु २००० चौरस मीटर पर्यंत भूखंडा अंतर्गत मोठ्या इमारतीचे एकूण तलपृष्ठ क्षेत्र. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक नाही | | ७५,००० | (टीप १४) | आवश्यक नाही |
| | (तीन) २००० चौरस मीटरपेक्षा अधिक भूखंडाअंतर्गत मोठ्या इमारतीचे एकूण तलपृष्ठ क्षेत्र. | आवश्यक | आवश्यक | (टीप १८, १९, २१ (क) व २१ (ख)) | | | | | | | | | |
| **ग** | **अति धोका (छ-३)** (टीप ३ (क) व १६ (ग)) | आवश्यक | आवश्यक | (टीप १८, १९, २१ (क) व २१ (ख)) | | | | | | | | | |
| | **साठवण इमारती (ज)** (टीप ३ग, ३घ, ३छ व ३ज पहा) | | | | | | | | | | | | |
| १ | १५ मीटर पेक्षा कमी उंच असलेल्या व १००० चौरस मीटरपेक्षा कमी क्षेत्र व्यापलेल्या. | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक (टीप-४) | आवश्यक नाही | आवश्यक नाही | ५०,००० | आवश्यक नाही | (टीप १४) | आवश्यक नाही |
| २ | १५ मीटरपेक्षा कमी उंच असलेल्या व १००० चौरस मीटर पेक्षा अधिक क्षेत्र व्यापलेल्या | | | | | | | | | | | | |
| | (एक) केवळ तळमजला | आवश्यक | आवश्यक | (टीप १८, १९, २१ (क) व २१ (ख)) | | | | | | | | | |
| | (दोन) तळमजला अधिक एक मजला | आवश्यक | | | | | | | | | | | |
| | (तीन) तळमजला अधिक एक मजल्याहून अधिक. | आवश्यक | आवश्यक | | | | | | | | | | |
| ३ | १५ मीटरपेक्षा अधिक उंच असलेल्या परंतु २४ मीटरपेक्षा अधिक नसलेल्या (टीप ३ (ग) व ३ (छ) पहा) | आवश्यक | आवश्यक | | | | | | | | | | |
| ४ | बहुस्तरीय वाहन तळ (एमएलसीपी) (टीप ३ (घ) पहा) | आवश्यक | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप १५(क) व १५(ख) पहा) | आवश्यक | आवश्यक नाही | १,५०,००० | आवश्यक नाही | (टीप ११) | आवश्यक नाही |
| ५ | यांत्रिक वाहनतळ (स्वयंचलित) (टीप ३(ज) पहा) | आवश्यक | आवश्यक | आवश्यक नाही | आवश्यक नाही | आवश्यक | आवश्यक (टीप ७ पहा) | आवश्यक नाही | आवश्यक | ५०,००० | आवश्यक नाही | (टीप १४) | आवश्यक नाही |
| | **धोकादायक इमारती (झ)** (टीप ३ (क)) | | | | | | | | | | | | |
| (१) | १५ मीटर पर्यंत उंच असलेल्या | आवश्यक | आवश्यक | | | | | (टीप १८, १९, २०, २१ (क) व २१ (ख)) | | | | | |

| टिपा | आवश्यकता |
|---|---|
| १. | जेव्हा या यंत्रणा २४ मीटर व त्यापेक्षा अधिक उंचीच्या इमारतींसाठी पुरवण्यात येतील तेव्हा, क-३ व क-४ भोगवट्यांखेरीज, हस्तचलित इलेक्ट्रॉनिक आग सूचक यंत्रणेमध्ये (एमओइएफए), १५ मीटर व त्यापेक्षा अधिक उंचीच्या सर्व इमारतींमध्ये, प्रतिध्वनी प्रणालीचा (टॉक-बॅक सिस्टीम) व सार्वजनिक ध्वनिक्षेपक प्रणालीचा देखील समावेश असेल. या यंत्रणा, ३०० चौरस मीटर क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्र असणाऱ्या मोटार वाहनतळामध्ये (कार पार्किंगमध्ये) आणि त्यांचे क्षेत्र विचारात न घेता, बहुस्तरीय मोटार वाहनतळामध्ये (मल्टी-लेवल कार पार्किंगमध्ये) देखील पुरवण्यात येतील. |
| २. | वाहनतळ क्षेत्रामध्ये, स्वयंचलित तपास व आग सूचक यंत्रणेची तरतूद करण्याची आवश्यकता नाही. तथापि, अशी तपास यंत्रणा, विद्युत खोल्या, केबिन व अन्य साठवण क्षेत्रे यांसारख्या अन्य वाहनतळ क्षेत्रांमध्ये आवश्यक असेल. |
| ३(क) | १५ मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतींना, गट-झ भोगवट्यांकरिता परवानगी असणार नाही. |
| ३(ख) | ३० मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतींना, गट-ग-२ व ग- ३, गट- घ व गट- च भोगवट्यांकरिता परवानगी असणार नाही. |
| ३(ग) | २४ मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतींना, गट- छ (प्रक्रियेच्या प्रयोजनार्थ आवश्यक नसेल तर) आणि गट-ज साठी परवानगी असणार नाही. |
| ३(घ) | ४५ मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतींना, गट-क-१ व क-२, गट- ख, व गट- ज- ४ बहुस्तरीय मोटार वाहनतळ (एमएलसीपी) भोगवट्यांसाठी परवानगी दिली जाणार नाही. |
| ३ (ड.) | ४५ मीटरपेक्षा अधिक उंचीच्या इमारतींना गट ग-१ भोगवट्यांसाठी परवानगी देता येईल, परंतु अशा भोगवट्यासंबंधात राष्ट्रीय आग सुरक्षा संघीय संस्था (यु.एस.ए.) वेळोवेळी निर्धारित केलेल्या निकषांची पूर्तता व त्याचे अनुपालन केले पाहिजे. |
| ३ (च) | उच्च माध्यमिक शिक्षण व त्यापुढील व तत्सम शिक्षणासाठी, केवळ शैक्षणिक प्रयोजनाकरिता असलेल्या इमारतीना स्थानिक अग्निशमन सुविधांच्या उपलब्धतेस अधीन राहून ३० मीटरपेक्षा अधिक उंचीची परवानगी असेल. |
| ३ (छ) | साठवण इमारतींना स्थानिक अग्निशमन सुविधांच्या उपलब्धतेच्या अधीन राहून १५ मीटरपेक्षा अधिक आणि २४ मीटरपेक्षा अधिक नसणाऱ्या साठवण इमारतीस परवानगी देता येईल. |
| ३ (ज) | स्वयंचलित यांत्रिक वाहन तळ किंवा डिझेल जनरेटर संच ठेवणे यांसारख्या प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या अशा कोणत्याही अन्य संरचनांना १०० मीटर पर्यंत किंवा स्थानिक अग्निशमन सुविधांच्या उपलब्धतेस अधीन राहून इमारत उपविधी अन्वये विनिर्दिष्ट केली असेल अशा परवानगीयोग्य कमाल उंचीस, यांपैकी जी कमी असेल त्या उंचीस परवानगी असेल. जर त्या संरचना, इमारतीला संलग्न असतील तर त्या भिंतीची (डेड वॉलची) आग प्रतिरोधक क्षमता दोन तास इतकी असेल. |
| ४. | जर तळघराचे क्षेत्र, २०० चौरस मीटरपेक्षा अधिक असेल तर, तळघरामध्ये बसवण्याची आवश्यकता असेल. |
| ५. | जर तळघराचे क्षेत्र, २०० चौरस मीटरपेक्षा अधिक असेल तर, तरतूद करण्याची आवश्यकता आहे. |
| ६. | जर तळघराचे क्षेत्र, २०० चौरस मीटरपेक्षा अधिक असेल तर, गोल कंसामध्ये दिलेले अतिरिक्त मूल्य मिळवण्यात येईल. |

| टिपा (१) | आवश्यकता (२) |
|---|---|
| ७. | दोनपेक्षा अधिक मजल्यांच्या (तळ मजला + एक) इमारतींसाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. |
| ८. | विविध वर्गीकरणे असणाऱ्या भोगवट्यांच्या इमारतीचा (इमारतींचा) समावेश असलेल्या संकुलाच्या बाबतीत, वैयक्तिक भोगवट्यांसाठी लागू असलेल्या भारतीय राष्ट्रीय इमारत संहितेमधील अत्यंत निर्बंधित तरतुदींद्वारे आग संरक्षण प्रणालीचे नियमन करण्यात येईल. |
| ९. | तक्त्यातील संबंधित बाबींखाली नमूद केल्याप्रमाणे, विनिर्दिष्ट क्षमतेच्या उपरी टाक्यांची (लागू असेल तर टेरेस पंपासह) प्रत्येक इमारतीसाठी/मनोऱ्यासाठी तरतूद करण्यात येईल. इमारत (इमारती)/ मनोरा (मनोरे), संलग्न किंवा असंलग्न स्थितीत आहे/आहेत किंवा कसे. याशिवाय, टाक्या, तक्त्यात लागू असल्याप्रमाणे, तुषार प्रणालीस, डाऊन कॉमर्सला (खाली येणाऱ्या) व होज रीळला (फिरकी गुंडाळीला) एकतर थेटपणे किंवा टेरेसवरील पंपामार्फत जोडण्यात येतील. |
| १० | प्रत्येकी १०० अग्निशामक नळखांबांसाठी (हायड्रंट) व त्याच्या भागासाठी, त्याच भुयारी पाण्याच्या टाकीवर कमाल दोन संचांसह पंपांचा एक संच पुरवण्यात येईल. या प्रकरणी, वीजेवर चालणारा एक पंप, डिझेलवर चालणारा एक राखीव (स्टँडबाय) पंप (२२८० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेला) आणि वीजेवर चालणारा एक जॉकी पंप (१८० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेला) यांचा समावेश असलेला एक संच पुरवण्यात येईल. |
| ११. | प्रत्येकी १०० अग्निशामक नळखांबांसाठी (हायड्रंट) व त्याच्या भागासाठी, त्याच भुयारी पाण्याच्या टाकीवर कमाल दोन संचासह, पंपांचा एक संच पुरवण्यात येईल. या प्रकरणी, २२८० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेला वीजेवर चालणाऱ्या दोन पंपांचा (प्रत्येकी एक संच हायड्रंटसाठी व तुषार प्रणालीसाठी) समावेश असेल. डिझेलवर चालणारा एक साधारण राखीव (स्टँडबाय) पंप (२२८० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेला) आणि वीजेवर चालणारे दोन जॉकी पंप (१८० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेल्या व प्रत्येकी एक संच हायड्रंटसाठी व तुषार प्रणालीसाठी असलेल्या) पुरवण्यात येईल. |
| १२. | प्रत्येकी १०० अग्निशामक नळखांबांसाठी (हायड्रंट) व त्याच्या भागासाठी, त्याच भुयारी पाण्याच्या टाकीवर कमाल दोन संचासह, पंपांचा एक संच पुरवण्यात येईल. या प्रकरणी, २८५० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेला वीजेवर चालणाऱ्या दोन पंपांचा (प्रत्येकी एक संच हायड्रंटसाठी व तुषार प्रणालीसाठी) समावेश असेल. डिझेलवर चालणारा एक साधारण राखीव (स्टँडबाय) पंप (२८५० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेला) आणि वीजेवर चालणारे दोन जॉकी पंप (१८० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेल्या व प्रत्येकी एक संच हायड्रंटसाठी व तुषार प्रणालीसाठी असलेल्या) पुरवण्यात येईल. |
| १३. | निम्न पातळीवरील ६० मीटर किंवा त्यापेक्षा अधिक उंच इमारतींमध्ये, उच्चदाब असल्याचे अनुभवास येते आणि म्हणून, बहु-स्तरीय, बहु-निर्गमद्वार असलेल्या पंपांचा (दाब प्रक्षेत्र निर्माण करणारे) विचार करणे अथवा एका किंवा अधिक स्तरावर पंप बसविणे अथवा विविध वारंवारता चालक पंप (व्हेरियबल फ्रिक्वेन्सी ड्राईव्ह पंप) बसविणे किंवा अन्य कोणतीही तत्सम व्यवस्था करणे आवश्यक आहे. |
| १४. | प्रत्येकी १०० अग्निशामक नळखांबांसाठी (हायड्रंट) व त्याच्या भागासाठी, त्याच भुयारी पाण्याच्या टाकीवर कमाल दोन संचासह, पंपांचा एक संच पुरवण्यात येईल. या प्रकरणी, |

| टिपा (१) | आवश्यकता (२) |
|---|---|
| | वीजेवर चालणारा एक पंप, डिझेलवर चालणारा एक राखीव (स्टँडबाय) पंप (१६२० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेला) आणि वीजेवर चालणारा एक जॉकी पंप (१८० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेला) यांचा समावेश असलेला एक संच पुरवण्यात येईल. |
| १५(क) | जेव्हा तक्त्यामध्ये दोन्ही टाक्या विहित केलेल्या असतील तेव्हा, भूमिगत स्थिर जल साठवण टाकी व टेरेसवरील (छतावरील) टाकी या दोन्ही टाक्यांमधून तुषार पद्धतीने (स्प्रिंकलरद्वारे) पाणीपुरवठा करण्यात येईल. |
| १५(ख) | संपूर्ण इमारतीचे (इमारतींचे), म्हणजेच, सामायिक क्षेत्रांचे तसेच राहण्यायोग्य क्षेत्रांचे संबंधित भारतीय मानकांनुसार स्वयंचलित तुषार यंत्रणेद्वारे (ऑटोमॅटिक स्प्रिंकलर) संरक्षण करण्यात येईल. |
| १६(क) | भारत सरकारने, ज्या उद्योगांना "कारागीर कार्यशाळा", "ग्रामोद्योग व कुटीर उद्योग", "अतिलघु क्षेत्रातील उद्योग" म्हणून निश्चित केले होते किंवा लायसन दिले होते अशा उद्योगांना केवळ अग्निशामक व अग्निशामक बादल्या पुरवण्याची गरज असेल, परंतु, त्यांचा दर्जा व वितरण करताना संबंधित भारतीय मानकांचे पालन करण्यात येईल. |
| १६(ख) | औद्योगिक इमारतीमधील बहुस्तरीय औद्योगिक भोगवट्यांचे (सर्व उद्योग एकाच इमारतीत असलेल्या), "मध्यम" धोकादायक उद्योगांसाठी असलेल्या आवश्यकतांनुसार संरक्षण करण्यात येईल. अशा इमारतींमध्ये कोणत्याही अति धोका असलेल्या भोगवट्यांस मुभा असणार नाही. |
| १६(ग) | पेट्रोकेमिकल उद्योग रिफायनरी व तत्सम उद्योग यासारख्या अति धोका असलेल्या उद्योगांच्या बाबतीत, वरील तक्त्यामध्ये दिलेल्या आवश्यकतांचे पालन करण्याबरोबरच, तेल उद्योग सुरक्षा संचालनालयाच्या व तत्सम संस्थांच्या वैधानिक शर्तींचे (आवश्यकतांचे) अनिवार्यपणे अनुपालन करावयाचे आहे. |
| १७. | संपूर्ण भोगवट्याचे, किमान ९०० लिटर प्रति मिनिट विसर्ग क्षमता असलेल्या विजेवर चालणाऱ्या एका पंपाने, तत्सम एका राखीव (स्टँडबाय) पंपाने (खात्रीशीर बॅकअप पुरवठा असलेल्या) आणि किमान १८० लिटर प्रति मिनिट क्षमता असलेल्या एका जॉकी पंपाने संरक्षण करण्यात येईल. |
| १८ | संपूर्ण भोगवट्याचे, सर्व बाबतीत, संबंधित भारतीय मानक संहितेनुसार लागू असेल त्याप्रमाणे, हायड्रंट, तुषार यंत्रणा (स्प्रिंकलर), जल फवारे (वॉटर स्प्रे), जल धुके (वॉटर मिस्ट), वायू आधारित यंत्रणा, फोम, आगसूचक यंत्रणा, इत्यादीद्वारे संरक्षण करण्यात येईल, त्यामध्ये पंप, पाईप लाईन्स, इत्यादींचे संकल्पचित्र व संच मांडणी यांचा समावेश असेल. खालील टिप १९ व २१ पहा. |
| १९ | विवक्षित भोगवट्यांचे, जर अशा प्रणाली, अशा भोगवट्यांसाठी मान्यताप्राप्त राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय एजन्सीकडून मूल्यमापन/ प्रमाणित केलेल्या असतील तर, यथोचित उपयोजकांसह (दाब), स्वयंचलित जल धुके (वाटर मिस्ट) प्रणालीद्वारे देखील संरक्षण करता येईल. भारतीय मानक-१५५१९ च्या विविध तरतुदींचे पालन करण्याबरोबरच, अशा प्रणालींची संच मांडणी व संकल्प चित्र, चाचणी शर्तींचे पालन करून केलेल्या वस्तूनिर्मिती विनिर्देशांनुसार असेल आणि तिला संबंधित प्राधिकरणांची स्वीकृती असली पाहिजे. जर विख्यात चाचणी एजन्सीद्वारे विशेषकरून परवानगी दिलेली नसेल तर, मोठ्या क्षेत्रांसाठी संरक्षण पुरविण्याकरिता चाचणी निकालांचे बहिर्वेशन(एक्स्ट्रापोलेशन) करण्यास मुभा दिली जाणार नाही. |
| २०. | अग्निशामक नळखांब (हायड्रंट) असलेल्या प्रणालीसाठी पंपांची क्षमता, इमारतींच्या आच्छादित |

| टिपा (१) | आवश्यकता (२) |
|---|---|
| | क्षेत्रांवर आधारित असेल, म्हणजेच ५०० चौरस मीटर पर्यंतच्या क्षेत्रासाठी, पंप क्षमता, २.० लीटर प्रति मिनिट/चौरस मीटर या दराने असली पाहिजे, ५०० चौरस मीटरपेक्षा अधिक, परंतु १००० चौरस मीटर पर्यंतच्या क्षेत्रासाठी, पंप क्षमता, २.५ लीटर प्रति मिनिट/चौरस मीटर या दराने असली पाहिजे. १००० चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रांसाठी जर तेथे दोन तासांसाठी अग्निशमन विलगीकरण सममूल्यक (इक्विव्हेलंट) नसेल तर, ती स्वीकारण्यायोग्य असणार नाही. संपूर्ण अग्निशामक नळखांब (हायड्रंट) व तुषार यंत्रणा (स्प्रिंकलर) यांचे, संबंधित भारतीय मानकानुसार संकल्पचित्रण असेल. पहा टिपा १८, १९ व २१(क) व २१ (ख). |
| २१(क) | वर्गीकरण— क ते झ खालील सर्व भोगवट्यांसाठी, जेथे जेथे वरील तक्त्यामधील संबंधित स्तंभांमध्ये व टिपांमध्ये नमूद केले असेल तेथे पंपांच्या क्षमता व पाण्याची आवश्यकता यांची तरतूद करण्याची गरज असेल. तथापि, जेव्हा पंपिंग क्षमता आणि ज्या कोणत्याही आवश्यकता, संबंधित स्तंभांमध्ये नमूद केलेल्या नसतील तेव्हा, तपशिलासाठी हायड्रंट/स्पिंकलर्स/वॉटर स्प्रे, इत्यादींच्या कार्यपद्धतीच्या संबंधित भारतीय मानक संहितेचा संदर्भ घेण्यात येईल. कोणत्याही प्रकरणांमध्ये, हायड्रंट, स्प्रिंकलर्स, वॉटर स्प्रे, इत्यादींसारख्या प्रणालीचे संकल्प चित्रण व संच मांडणी, आयएस-१३०३९, आयएस-१५१०५, आयएस-१५३२५, इत्यादीसारख्या कार्यपद्धतीच्या संबंधित संहितेमधील तरतुदींनुसार काटेकोरपणे पालन करण्यात येईल. |
| २१(ख) | जेव्हा जल प्रतिरोधी साहित्यामुळे किंवा अन्य वैध स्वीकार्य कारणामुळे आग विझविणारे माध्यम म्हणून पाण्याचा वापर करणे उचित नसेल तेव्हा, यथोचित प्राधिकरणांशी सल्लामसलत करून, सुयोग्य असलेल्या पर्यायी आग विझविणाऱ्या प्रणालीची व पद्धतीची तरतूद करण्यात येईल. सुचविलेल्या संरक्षण पद्धतीमध्ये संबंधित भारतीय मानकांचे सर्व बाबतीत अनुपालन करण्यात येईल. आगीची पूर्वसूचना देणाऱ्या (फायर अलार्म) वायू आधारित यंत्रणा, इत्यादी अन्य प्रकारच्या प्रणालींचेदेखील, संबंधित भारतीय मानकांनुसार सर्व बाबतीत संकल्प चित्रण व संच मांडणी करण्यात येईल. |
| २२. | स्थानिक प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार, डोंगराळ क्षेत्रामध्ये, औद्योगिक क्षेत्रांमध्ये किंवा आवश्यक असेल त्याप्रमाणे शुष्क उन्मार्गांचा (ड्राय रायझर) वापर करण्यात यावा. |

## अनुसूची - दोन

(कलम ११ पहा)

## अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी संरचना

**१.** अग्निशमन व आपत्कालीन सेवा फी , खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, (१९५८ चा ६०) या अन्वये तयार केलेल्या महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ याच्या तरतुदींअन्वये प्रसिद्ध केलेल्या वार्षिक दर विवरणपत्राच्या (एएसआर) टक्केवारी अनुसार इमारतीच्या विविध प्रवर्गांसाठी बांधीव क्षेत्राच्या प्रति चौरस मीटरप्रमाणे आकारण्यात येईल :—

**तक्ता**

| अ.क्र. | इमारतीची उंची मीटरमध्ये | वार्षिक दर विवरणपत्राच्या टक्केवारीनुसार (एएसआर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | संस्थेची इमारत | वाणिज्यिक | औद्योगिक |
| १ | ४५ मी. पर्यंतची इमारत | ०.२५% | ०.५०% | ०.७५% | ०.७५% |
| २ | ४५ मी. पेक्षा उंच इमारत | ०.५०% | ०.७५% | १.००% | १.००% |

**२.** वरील परिच्छेद १ मधील भोगवट्यांचे वर्गीकरण, अग्निशमन व जीवसंरक्षण याबाबतीत भारतीय राष्ट्रीय इमारत संहितेच्या भाग ४ मध्ये वर्गीकृत केल्याप्रमाणे असेल, जे पुढीलप्रमाणे आहे :—

(क) " **निवासी इमारत** " याचा अर्थ, उक्त संहितेच्या उप-गट क-५ व क-६ खेरीज, त्याच्या भाग ४ च्या गट क मध्ये नमूद केलेले निवासी भोगवटे, जसे की, निवासगृह (लॉजिंग), भोजनगृह (बोर्डिंग), शयनगृह (डॉर्मेटरी), वेश्म (अपार्टमेंट) व बहुस्तरीय मोटार वाहनतळ (मल्टी लेव्हल कार पार्किंग) व स्वयंचलित यांत्रिक मोटार वाहनतळ (मॅकेनाइज्ड पार्किंग), इत्यादी असा आहे.

(ख) " **संस्थेची इमारत**" याचा अर्थ, उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट ख मध्ये नमूद केलेले शैक्षणिक भोगवटे आणि उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट ग मधील संस्थात्मक भोगवटे, जसे की, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ, रुग्णालय, शूश्रुषा गृह, इत्यादी, असा आहे.

(ग) " **वाणिज्यिक इमारत**" याचा अर्थ, उक्त संहितेच्या भाग ४ च्या उप-गट क-५ व क-६ मध्ये नमूद केलेले भोगवटे आणि उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट घ मधील सभागृह भोगवटे, उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट ङ मधील व्यवसाय भोगवटे आणि उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट च मधील व्यापारी भोगवटे, जसे की, हॉटेल, खानपान गृहे, मॉल, मल्टिप्लेक्स (बहुपडदा चित्रपटगृह), नाट्यगृह (थिएटर), दुकाने, इत्यादी असा आहे.

(घ) " **औद्योगिक इमारत** " याचा अर्थ, उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट छ मध्ये नमूद केलेले औद्योगिक भोगवटे, उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट ज मधील साठवण भोगवटे (बहुस्तरीय मोटार वाहनतळाखेरीज) आणि उक्त संहितेच्या भाग ४ च्या गट झ मधील धोकादायक भोगवटे, असा आहे.

**टिपा.—इमारतीच्या वरील वर्गीकरणानुसार खालीलप्रमाणे फी ची परिगणना करण्यात येईलः—**

१. वार्षिक दर विवरणपत्राच्या आवश्यक टक्केवारीची परिगणना केल्यानंतर, आवश्यक मान्यतेसाठी विचाराधीन असलेल्या इमारतीच्या बांधीव क्षेत्राने, फी ला गुणण्यात येईल.

२. फी निर्धारित करण्याच्या प्रयोजनांकरिता (बांधीव क्षेत्र) हे, स्थूल बांधीव क्षेत्र असेल त्यात वास्तुशास्त्रज्ञाने प्रमाणित केलेल्या आणि इमारतीच्या बांधकामाच्या परवानगीसाठी केलेल्या अर्जासह प्राधिकरणाकडे सादर केलेल्या इमारतीच्या आराखड्यामध्ये दाखविल्याप्रमाणे, तळ मजला, सुविधाधिकार क्षेत्र, पादयष्टी (स्टिल्ट), पोडीयम, जिना, उद्‌वाहने, ओटा (लॉबी), व्हरांडा (पॅसेज), सज्जा (बाल्कनी), कमानीचा भाग (कॅन्टीलिव्हर पोर्शन), सेवा मजला, आश्रय क्षेत्रे (रेफुजी), इत्यादी यांचा समावेश होतो. या प्रयोजनाकरिता बांधीव क्षेत्राची परिगणना करताना त्याचा चटई क्षेत्र निर्देशांकाशी किंवा अन्य कोणत्याही रीतीने परिगणना केलेल्या बांधीव क्षेत्राशी कोणताही संबंध असणार नाही.

३. परिगणना करावयाची फी, इमारतीच्या सर्वात खालच्या स्तरापासून ते इमारतीच्या राहण्यायोग्य असलेल्या शेवटच्या मजल्यापर्यंत आकारण्यात येईल. मात्र तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे इमारतीची उंची निर्धारित करताना फीची स्लॅबनिहाय परिगणना करण्यात येणार नाही.

४. फीचे निर्धारण करण्याच्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तविक बाजार मूल्य निर्धारण करणे) नियम, १९९५ याच्या तरतुदीअन्वये प्रसिद्ध केलेले वार्षिक दर विवरणपत्रातील दर हे महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्गमित केलेले इमारत बांधकाम दर असतील.

५. भारतीय राष्ट्रीय इमारत संहिता, भाग ४ नुसार १५ मीटर खालील भोगवट्याच्या उप-गट क-२ व क-४ म्हणून निश्चित केलेल्या इमारतीकरिता आणि या अधिनियमाच्या कलम १५ मध्ये असलेल्या सर्व इमारतींकरिता कोणतीही फी आकारली जाणार नाही.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.